RONICLE OF HU
ND CULTURAL
A Peer Reviewed ... International Jo...
Special Issue On
T OF SOCIAL MEDI

Vol. 5 | No. 5 | October 2019 Impact Factor: 4.197 | ISSN: 2454-5503


# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A Peer Reviewed Monthly International Journal

265

Special Issue On

## IMPACT OF SOCIAL MEDIA ON SOCIETY




Guest Editor
Dr. Vasant Satpute

Associate Editor
Dr. M. D. Kachave

Assistant Editors
Dr. B. V. Andhale
Dr. M. G. Somvanshi
Dr. A. B. Sarkale

कौशल्य, मुद्रित प्रसार माध्यमातील मुलांच्या साहित्यामुळे सर्वाधिक विकसित होते हे सिध्द झाले आहे. वाचनाची सवय मुलांना लावण्यासाठी मुद्रित प्रसार माध्यमातील मुलांच्या साहित्याचा सर्वाधिक उपयोग होतो.

मुलांसाठी मुद्रित प्रसार माध्यमांनी प्रसिध्द केलेल्या साहित्याचा दर्जा हा चांगला असतो. हे साहित्य शाळेमध्ये सहज उपलब्ध असते. म्हणून विविध मूल्य रुजविण्यासाठी, शैक्षणिक अडथळे सोडवण्यासाठी, मूलांना अध्ययनाची गोडी लावण्यासाठी शिक्षक मुद्रित प्रसार माध्यमातील साहित्याचा अध्यापनात उपयोग करतात. अनेक कथा, विनोद, लेख, कृतियुक्त साहित्यामुळे मुलांचे अध्ययन आनंददायी होते.

**समारोपः** आधुनिक प्रसार माध्यमांच्या युगात मुद्रित प्रसार माध्यमे सामाजाला शिक्षण, माहिती, मनोरंजन देण्याच काम करतात. मुलांचे मुद्रित प्रसार माध्यम मुलांसाठी विविध प्रकारचे साहित्य प्रकाशित करतात. या साहित्याचा परिणाम मुलांच्या विकासावर होतो. मुलांच्या बौध्दिक विकासात मुद्रित प्रसार माध्यमातील महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. मुद्रित प्रसार माध्यम साहित्य मुलांवर संस्कार करतात. मुलांच्या ज्ञानात वाढ होऊन मुलांच्या कक्षा रुंदावतात.

मुलांच्या भाषिक क्षमता (कौशल्य) विकासात मुद्रित प्रसार माध्यमाने मुलांसाठी प्रसिध्द केलेल्या साहित्याचा उपयोग होते. मुद्रित प्रसार माध्यमातील साहित्यामुळे वाचन ही मुलभूत भाषिक क्षमता सर्वाधिक विकसीत होते. मुद्रित प्रसार माध्यमातील मुलांच्या साहित्याचा उपयोग शिक्षक अध्यापनात करतात. यावरुन मुद्रित प्रसार माध्यमांनी मुलांसाठी प्रसिध्द केलेले साहित्य मुलांच्या विकासासाठी उपयुक्त आहे असा निष्कर्ष निघतो.

**संदर्भ :**


१. डॉ.धारुरकर वि.ल.(२००८). जनसंवाद सिध्दांत. औरंगाबाद : चैतन्य प्रकाशन.पान क्र.१३३.

२. डॉ.हंडीबाग भारत, डॉ.सरकटे सदाशिव (२०१४). दृकश्राव्य माध्यमांसाठी लेखन कौशल्य. औरंगाबाद : एज्युकेशनल पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रिब्युटर्स.

३. डॉ.टिळक गिताली (२०१८). पीएचडी प्रबंध, 'A study of content Analysis of marathi children periodicals for enhancing multiple skills among children.' टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे. पान क्र. १८४.

४. सौ.गोलप ल.रा. (२००९). पीचडी प्रबंध, 'किशोर मासिकाचे वाङ्मयीन कार्य.' पुणे विद्यापीठ,पुणे. पान क्र.२.

५. आंबेकर नी.श. (१९९०). शिक्षण प्रवाह, मूल्यांचे शिक्षण. पुणे : महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे. पान क्र.२५

६. कुलकर्णी अ.प्र. (२०१८). मराठी माध्यमाच्या इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानरचना पातळीवर विकसित झालेल्या मराठी भाषेतील शब्दसंपत्तीचे विश्लेषण करुन त्याचा तुलनात्मक अभ्यास. Scholarly Research Journal for Humanity Science & English Language. Vol. ५/२५.


❑❑❑



# सामाजिक माध्यमांचे परिणाम व उपाय

**डॉ.भिसे आर.एम.**

**प्रस्तावना :** वृत्तमानपत्र, रेडिओ, टि.व्ही.चित्रपट यासारखी जी माध्यमेहोती.त्या माध्यमातूनसमाजातील घटकावर परिणामहोतहोता.तेथे फक्त संदेशवहन एक मार्गीहोते.फक्त माध्यमांनीसांगायचे इतरांनी ऐकायचे व पहायचे, ऐकणाऱ्याल तेथे अभिव्यक्त करण्याचे स्वातंत्र्य नव्हते.या माध्यमाचेहीसकारात्मक व नकारात्मक परिणामांना समाजातील घटकांनासामोरे जावे लागते.या माध्यमाचे कार्यसुरू असलेतरीही सर्व माध्यमे एकास्मार्ट मोबाईलवर सोशलमिडियाच्या माध्यमातून उपलब्ध झालेले आहेत.

प्रत्येक व्यक्तीला अभिव्यक्त होण्याचीसंधीही १९९७ ला सर्वप्रथम सिक्सडिग्रीज कॉम पहिलेसंकेतस्थळसुरू झाले.माध्यमामध्ये 'सोशल मिडिया' या माध्यमांनेसमाजातील या व्यवस्थेत प्रवेश केला. या माध्यमातून व्यक्तीला स्वतःचे 'प्रोफाईल पेज' तयार करणे, मित्रमंडळाची यादीतयार करणे, जुनी मित्र शोधणेहे कार्यसुरू झाले. संवाद साधनेहेच मुख्य उद्दिष्टेसामाजिक माध्यमाचेहोते.

**सोशल नेटवर्क सेवेला प्रारंभ झाला :**

- इंटरनेटवर उपलब्ध असणारा, विविध व्यक्तीशी संपर्कसाधून देणारा व ते जपून ठेवणारा मंच म्हणजेसोशल नेटवर्क सेवा होय.
- 'सोशल नेटवर्क' म्हणजे जेथे असे सामाजिक जाळेतेथे समाज विचार, आवडी-निवडी, लोक एकत्र येऊन आपला गट स्थापन करतात.
- भारतातील २५ करोड लोक आज स्मार्ट फोनचा वापर करीत आहेत. त्यामध्ये १५ ते २० करोडच्या दरम्यान लोकहे दररोजसोशल मिडियाचा वापर करीत आहेत. समाजात युवक या मिडियाचा सर्वाधिक वापर करताना दिसून येतात. १५ ते ६० वयोगटातील सदस्यसुद्धा या सोशल मिडियाचा वापर करणारे आहेत.

सोशल मिडियामध्ये फेसबुक, युट्युब, वॉटसअॅप, इन्स्टाग्राम, ट्युटर, स्नॅपचॅट, इ.चा उल्लेख करावा लागतो.या सर्वच माध्यमातून आपल्या इंटरनेटसारख्या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जगाशीजोडलेले आहे.सोशल मिडियाच्या या माध्यमातून प्रत्येक व्यक्तीला अभिव्यक्त होण्याचीसंधी उपलब्ध झाली.त्यामुळेहे माध्यम आतापर्यंतच्या माध्यमापेक्षा सर्वात अधिक लोकप्रिय झालेले आहे.

विश्वातील कोणत्याही व्यक्तीशी तुम्ही या माध्यमात काहीसेकंदाततुमचासंदेश पाठवू शकतात.सोशल मिडियाचा वापर करूनसमाजातील प्रत्येक घटकांपर्यंत

पोहचता येते.मोबाईलचा वापर करणाऱ्यांना धिरूभाई अंबानी यांच्या JIO कंपनी मोबाईल व इंटरनेट सुविधा कमी पैशात उपलब्ध करूनहे जाळे अधिक गतिमान होण्यासाठी मदत झाली आहे.अनेकांना परवडेल असा मोबाईल व इंटरनेट संच उपलब्ध झालीत्यामुळे त्यांचा वापर करणाऱ्यांची संख्या करोडोच्या घरात आहे.नाण्याला जशा दोन बाजू असतात.तशाच सकारात्मक व नकारात्मक बाजू सोशलमिडियाकडे आहेत.

व्यक्तीला अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण या मुलभूत गरजा जशा आहेत.तशीच 'स्मार्ट मोबाईल' ही एक गरज नव्याने तयार झालेली आहेस्मार्ट मोबाईल च्या माध्यमातून फेसबुक, ट्विटर, व्हॉटस्ॲप, युट्युब इ.वर आपले अकाऊंट काढतात.आपले अकाऊंट खाते काढल्यानंतर फेसबुक वर फ्रेंडस् ट्विटरवर व्यक्तीचे ग्रुपतयार करतो.हे जी काही नवीन नातीतयार झाली आहेत.त्या माध्यमातून आपण जगाशीसंपर्कात राहतो.या माध्यमातून ओळखीची व अनोळखीची व्यक्ती आपल्याशी जोडली जाते.प्रत्येक व्यक्ती आपले विचार या माध्यमातून बिनधास्तपणे कोणत्याही बंधनाशिवाय व्यक्त करतो.सोशल मिडियाहे माध्यम तंत्रज्ञानाचा वापर करून जगात आज सर्वाधिक लोकप्रिय माध्यम झालेले आहे.काहीसेकंदात आपण आपले विचार इतरांपर्यंत पोहचवू शकतो. 'सोशल मिडिया'चा वापर सुरू झाल्यामुळे सामान्य स्तरातील कलाकार, गायक, लेखक, कवी, एका रात्रीमधूनच लाखो लोकांपर्यंत पोहचण्याचे काम व लाईक, फॉलोवर्स घेण्याचे कार्य या माध्यमातूनहोते. अभिव्यक्ती स्वातंत्र्य असल्यामुळे देशाच्या सैनिक तेजबहादूर यांनी त्यांना कशा प्रतिचे जेवण मिळतेहे देशासमोर आणले.शासकिय पातळीवरून सोशल मिडियाच्या माध्यमातूनतक्रार नोंदवून घेतली जात आहे.उत्तर प्रदेशसरकारने पोलीसांना ट्विटरचा वापर करूनतक्रार नोंदवण्यास परवानगी दिली आहे.

**सामाजिक माध्यमाचेनकारात्मक परिणाम :**

**कुटुंबातील नातेसंबंधात परिवर्तन :**सोशल मिडियाच्या माध्यमातून जगभर नाते संबंध जोडत असलेतरी कुटुंबातील नाते मात्र दुरावलेले दिसून येत आहे. प्रत्येक जण सदस्यहे आपल्या अभासी जीवनात जगताना दिसतो. सोशल मिडियावरील नाते प्रत्यक्षात किती उपयुक्तठरेलहे सांगता येत नाही. त्यासाठी सर्वाधिक वेळ खर्च केला जातो. कुटुंबात गृहीणी म्हणून काम करणाऱ्या ९९% महिलांनी स्वतःचे व्हॉटसॲप ग्रुपतयार केले आहेत. दररोज ३ ते ४ तास खर्च करतात. या सर्वांचा परिणाम - कुटुंबातील नातेतोडण्यासाठीहोताना दिसून येतो.

**मुलांना न पेलवणारे संदेश :**स्मार्ट मोबाईलचा वापर ३ वर्षांच्या बालकांपासून तेसाठवर्षांच्या व्यक्तीपर्यंत केला जातो. या माध्यमातून येणारे फोटो, संदेशहे लहान वयातील मुलांना न पेलवणारे असतात. मुलांच्या व्यक्तीमत्वावर त्यांचे दुष्परिणामहोताना दिसतात. ७ वी, ८ वी च्या वर्गातील मुले फेसबुक वर आपले खाते काढताना दिसून येतात. त्यांच्यावरही या माध्यमाचा विपरीत परिणामहोऊनही मुले अभ्यासापासून दूर गेलेली आढळून येतात. मुले व व्यक्ती अतिवापरामुळे अलीप्त व आत्ममग्न होताना दिसून येत आहेत. तसेच पालकांनासखोल ज्ञान नसल्यामुळे मुलेचत्यांची मार्गदर्शक बनतात.

**फेक पोष्ट, संदेशाच्या माध्यमातून गैरसमज :** 'सोशल मिडियातून येणारे पोष्ट व संदेशहे कोणत्याही व्यक्तीकडून तयार करूनसरळ पाठवले जातात. कधी-कधीसमाजातील शांतता नष्ट करून अशांतता निर्माण करण्यासाठी असेसंदेश पाठवले जातात. धार्मिक दंगली, जाती दंगली घडवून आणण्याचे कामसोशल मिडियाच्या संदेशाच्या माध्यमातूनहोते. अनेकांचे खून झालेले नोंदी आहेत. हिंसक वळण समुदायास लागलेले आहे.'

**वैयक्तिक माहितीची चोरी :**सोशल मिडियावर वापर करणारा व्यक्ती आपली माहितीसातत्याने अपलोड करीत असते. जेव्हा ही माहिती, फोटो, व्हिडीओ आपण अपलोड करतो. तेव्हा तिचा वापर करण्याचा अधिकारहा त्या मिडियाला देतो. या मिडियाच्या माध्यमातून माहितीची चोरी केलेल्या अनेक दाहरणे आपल्याकडे आहेत.

**देशाच्या सुरक्षा व्यवस्थेला धोका :**सोशल मिडियाच्या माध्यमातून आपल्या देशातीलसैनिकांशी फ्रेंडशिप करून आपल्या देशाची महिती मिळवल्याची उदाहरणेसमोर आलेली आहेत. आपली गोपनीय माहिती मिळविण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवरून सातत्याने प्रयत्न सुरू असलेले दिसून येतात. जम्मु-काश्मिर मध्येसैनिक आतंकवादी विरोधी कसा लढा देत आहेत. हे व्हॉटस्ॲपवर सुरूहोते. जेव्हा आतंकवादी मारले गेले तेव्हा आतंकवादी धमकी दिलीतर त्या कुटुंबातील इतरसदस्य अंत्यविधीसाठी देखील येत नाहीत अशीस्थिती आहे.

**सामाजिक समस्यात वाढ :**सोशल मिडीयामुळे समाज शास्त्रज्ञापुढे एक आव्हान उभे आहे. सोशल मिडियाचा अति वापर करणाऱ्यासंबंधी काही समस्या समाजात निर्माण होत आहेत. नातेसंबंधात मतभेद निर्माण झाल्यामुळे कुटुंबातील नातेसंबंध, घटस्फोटाचे वाढते प्रमाण, धार्मिक व जातीयसंप्रदायाच्या आधारे धार्मिक दंगली घडून येताना दिसतात. अशाप्रकारे अनेक सामाजिक समस्यांना सामोरेजावे लागते. अंधश्रद्धा वाढवणारे संदेश, पुढे २१ जणांना पाठवा लाभ होईल असेसंदेश.

**आरोग्य विषयक प्रश्न :**सोशल मिडियाच्या अतिवापरामुळे व्यक्तीच्या आरोग्याचे अनेक प्रश्न व समस्या निर्माण झालेल्या आहेत. सोशल मिडियाचा अति वापर केल्यामुळे डोक्याचे आजार, चिडचिडेपणा, डिप्रेशन मध्ये जाताना दिसून येत. सातत्याने दिवस दिवसभर मोबाईलचा वापर करणारे व्यक्तींना या सोशल मिडियाचे व्यसन लागलेले दिसून येते. नेहमी नेहमी व्हॉटस्ॲप, फेसबुक वर आपल्याला कोणतेसंदेश आलेले आहेत का ?हेसातत्यानेतपासणे, इतराच्या सहकारी अकाऊंटतपासणे, स्पर्धा करणे, तुलना करणे यामधून मानसिकसंतूलन बिघडलेले दिसून येते.

सोशल मिडिया इतर व्यसनाप्रमाणेच एक व्यसन म्हणूनसमोर आलेले आहे.त्यामुळे बैंगलोर आणि इतर शहरातसोशल मिडियाचे व्यसन सोडवणारी केंद्र व सुरू झालेले आहेत.

**उपाय :**

**दैनंदिनसोशल मिडीया वापराचा वेळ निश्चित करा :** प्रत्येक व्यक्तींने स्मार्ट फोनच्या माध्यमातून जोसोशल मिडियाचा दैनंदिन वापर आहेत्यासाठी वेळ निश्चित करण्यात यावा.अनेक अभ्यासकांनी सांगितले की फक्त दिवसभरात तीस मिनिटे वापर करणे योग्य आहे.असे सांगितलेले आहे.त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने तीस निमिटे वापर करणे आरोग्यासाठी योग्य आहे.

**कार्यालयीन वेळेत वापर टाळावा :** शासनाचे कर्मचारीहे आपल्या नोकरीच्या वेळेत तीन तास सोशल मिडीयाचा वापर करतातअसे सर्वेक्षणातून पुढे आलेले आहे.त्यामुळे कार्यालयीन वेळेत सोशल मिडीयाचा वापर करण्यावर निर्बंध लावण्यात यावे.अशा प्रकारची व्यवस्था शासकीय कार्यालयात उभी करावी.अशा प्रकरची परिपत्रक काढण्यात यावे.

**व्हॉटसॲप ग्रुपवर पूर्व परवानगी घ्यावे :** सोशल मिडियाचा वापर करून व्हॉटसॲप ग्रुपतयार केले जातात.त्या ग्रुपमध्ये अनेकांना पूर्व परवानगीने सहभागी करून घेतले जाते.त्यावर अनेकसंदेश पाठवले जाते. जी कामाची माहितीतीसंदेश कचऱ्याप्रमाणे आपल्या ग्रुपवर टाकले जातात. तो कचरासाफ करण्याचे काम करावे लागते.तुम्हीसंदेश पाठवा आम्हीते डिलीट करीत राहतो.असे काम लागते.त्यामुळे ज्याला ग्रुपमध्ये घ्यायचेत्यांची पूर्वपरवानगीची व्यवस्था करावी.

**मुलांच्या वापरावर नियंत्रण :** मोबाईलचा वापर मुले करतात.परंतु अनेकसंदेश त्या वयातील मुलांत न पेलवणारे असतात.वेगवेगळया साईटस्तयार झालेल्या आहेत.ज्याच्या माध्यमातून मुले तिकडे आकर्षितहोतात.त्यामुळे मुलांच्याहातातस्मार्ट फोन दिल्यानंतरते त्यावर काय पाहत आहेत यासाठी पालकाचे लक्ष असले पाहिजे असेस्पष्टहोते.

**अतिवापर होत असेलतर डॉक्टरकडूनसमुपदेशन :** आपला मित्र किंवा नातेवाईक जरसातत्याने आवश्यकतेपेक्षा अधिकसोशल मिडियाचा वापर करीत असेलतर अशा व्यक्तीने डॉक्टरचा सल्ला घेतला पाहिजे.ज्यामुळे अतिवापर टाळता येईल. मित्र व नातेवाईक, मुले यांना अतिवापरापासून टाळता येईल.

**सक्षम कायद्याची आवश्यकता :** सोशल मिडियावर नियंत्रण ठेवण्यासाठी अद्यापहीएकही सक्षम कायदा अस्तीत्वात नाही.सोशल मिडियावर नियंत्रण करणारे प्रभावी सायबर कायदे निर्माण करूनत्यांची माहिती वापर करणाऱ्या प्रत्येक व्यक्ती पर्यंत पाठवण्यात यावे.सायबर कायदा प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

**फेक अकाऊंटवर नियंत्रण :** सोशल मिडियावर अनेक फेक अकाऊंट काढण्यात येतात.त्या माध्यमातून अनेक युवकांची युतींची फसवणूक केली जाते.त्यामुळे अशा प्रकारचे फेक अकाऊंटवर तपास घेऊन त्यावर नियंत्रण आणावे लागणार आहे.तसेच फेक अकाऊंटचा वापर करणाऱ्यावर कडक कारवाई करावी.

**सारांश :** सोशल मिडियाचा वापर सुरू झालेला असल्यामुळेसकारात्मक परिणाम त्याचा वापर यावर चर्चा हांवू लागली आहे.आपणास लक्षात येते की, प्रत्येक व्यक्तीच्या जीवनावर सोशल मिडियाचा नकारात्मक परिणाम लक्षा घेऊनहीसोशल मिडियाचा अतिवापर ही एक सामाजिक समस्या म्हणून पुढे येत आहे.त्यावर उपाय योजना संगण्याचा प्रयत्न येथे केलेला आहे.समस्यावर उपाय योजना करणे अत्यंत आवश्यक आहे.

**संदर्भ :**


१. Socialmedia-wikipedia.
२. www.investopedia.com.
३. www.socialmediatoday.com
४. www.socialmediexaminer


❑❑❑